# प्रकरण पहिले

## " दलित आत्मकथन : स्वरूप व विकास "

# प्रकरण - पहिले

## दलित आत्मकथन : स्वरूप व विकास ---

### स्वरूप --

मराठी साहित्यात जे विविध वाङ्मय प्रवाह निर्माण झाले आहेत त्यामध्ये अलिकडेच विकसित झालेला दलित साहित्याचा प्रवाह अनेकांचे लक्ष वेधून घेण्याइतपत समर्थ ठरला आहे. हजारो वर्षे अंधारात खितपत पडलेल्या दलित जीवनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच आत्मभानाचा प्रकाश दिला. त्यांना जागृत करून त्यांच्या ठिकाणी स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलीत केली. आंबेडकरांच्या या तात्विक विचारांच्या बैठकीतूनच हे साहित्य सिध्द झाल्यामुळे एका वेगळ्याच जाणिवेतून दलित लेखकांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी माध्यमातून उपेक्षितांचे जीवन चित्रित केले आहे. या मूक समाजाला नव्यानेच वाचा फुटल्यामुळे आजपर्यन्तच्या जीवनात ते जसे जगले, सोसले व भोगले ते आत्मनिष्ठपणे सांगण्याची गरज अल्पशिक्षित व शिक्षित दलितांना वाटू लागली. आणि यातूनच सर्वात सकस आणि समर्थ अशा आत्मकथनाचा त्यांनी मार्ग स्वीकारला. दलित साहित्याची प्रेरणा डॉ. आंबेडकरांचे जीवन व तत्वज्ञान आहे, त्यामुळेच आजची दलित आत्मकथने ही आंबेडकरी चळवळीशी निगडीत आहेत. त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव त्यावर आहे. आपले जीवनानुभव परखडपणे मांडणे हा आरंभप्रमादच त्याचे द्योतक आहे.

मराठीतील आत्मचरित्रांना दीडशे वर्षांची परंपरा आहे. पण अलिकडेच निर्माण झालेल्या या दलित आत्मकथनांची जसजशी संख्या वाढू लागली तसतसा त्यांचाही एक रूपबंध निर्माण होऊ लागला आहे. वरवर पाहता आत्मकथन हे आत्मचरित्र व आठवणी या साहित्यरूपांना जवळचे वाटणारे आहे. त्यामुळे

प्रथमपासून याकडे आत्मचरित्र म्हणूनच सामान्यत: पाहिले गेले. जरी दलित आत्मकथनांनी पारंपारिक आत्मचरित्राप्रमाणेच मर्यादित प्रमाणात स्वत:च्या अभिव्यक्तीला स्थान दिले असले तरी आत्मचरित्र या साहित्यरुपाशी त्याचा फारसा संबंध जुळवता येत नाही. तेव्हा यातूनच असा एक प्रश्न निर्माण होतो की, दलित साहित्यातील या साहित्यरुपास `आत्मचरित्र` म्हणून न संबोधता `आत्मकथन` असे का म्हणावयाचे ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला असता या आत्मकथनाच्या स्वरुपावर प्रकाश पडण्यासाठी मदत होते.

## (१) `आत्मकथन` संज्ञेचे स्पष्टीकरण ---

पुष्कळवेळा एखाद्या साहित्यकृतीच्या आकृतिबंध पूर्वीच्या साहित्यरुपाशी जुळणारा वाटत असला तरी त्याचे नवेपणाही वाचकांना जाणवत असते. अशा वेळी या साहित्याची वैशिष्ट्ये, निश्चित करावी लागतात. तेव्हा प्रस्तुत लेखनाला दलित आत्मचरित्रे, दलित आत्मस्मृति, दलित आत्मकहाणी व दलित आत्मकथा अशा अनेक नावाने संबोधले गेले. परंतु त्यामुळे या साहित्यरुपावर निश्चित स्वरुपाचा प्रकाश पडून त्याचे वेगळे स्वरुप स्पष्ट होत नाही. तेव्हा या साहित्यरुपाचे वेगळेपण जाणवून देण्यासाठी कांही विचारवंतांनी `दलित आत्मकथन` तर डॉ. आरती कुसरे - कुलकर्णी यांनी `दलित स्वकथने` या अशा संज्ञांचा अवलंब करुन यातील गर्भितार्थांना पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

आत्मकथन या संज्ञेतील `आत्म` हे विशेषण रुढ आत्मचरित्रातील संज्ञेत अंतर्भूत असले तरी त्याचे वेगळेपण अनेक कारणांनी आपल्या डोळ्यात भरते. आत्मकथनामागील प्रेरणा, स्वरुप व जीवन-जाणिवा यांचा साकल्याने विचार करता, सामाजिक विषमतेने व दलितत्वामुळे त्यांना जे जे भोगावं लागलं, जगतांना मनास चटके बसणारे जे जे अनुभव आले ते प्रामाणिकपणे व प्रांजळपणे मांडण्याच्या हेतूने ही आत्मकथने लिहिली गेली आहेत. तसेच या मागील

आत्मजाणीव ही आंबेडकरी प्रेरणेतून निर्माण झालेली असल्याने दलितांनी लिहीलेल्या या साहित्य प्रकारास `आत्मकथन` ही संज्ञाच समर्पक ठरते.

या दलित लेखकांना आपल्या व्यक्तित्वाचा आलेख आत्मचरित्रलेखकाप्रमाणे या लेखनातून मांडावयाचा नव्हता किंवा आपली वाड:मयीन मूर्ती त्यांना निर्माण करावयाची नव्हती, तर आपल्याला जे जीवन जगावे व भोगावे लागले त्यातील दु:खाची अभंगगाथाच, आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ अशा दोन्ही पातळ्यावर प्रकट करण्याची आवश्यकता वाटली. आणि त्यातूनच दलित आत्मकथन हा आकृतिबंध मराठी साहित्यात निर्माण झालेला पाहावयास मिळतो.' या दलित लेखकांनी आत्मनिष्ठपणे मांडलेल्या या साहित्यरूपास आत्मकथा न म्हणता आत्मकथन का म्हणावयाचे या विषयी प्रा.चंद्रकुमार नलगे व डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "कथन हे सातत्याचे प्रतिक आहे, तर कथेला शेवट असतो. ती पूर्णत्वाचा प्रत्यय देते, ती कुठेतरी थांबते आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरू असतो` या दृष्टीने विचार करता `दलित आत्मकथन` ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण व अन्वर्थक आहे."[१] दलित आत्मकथनामागील प्रेरणा, हेतू व त्यातील जाणिवांचा सारासार विचार करता या साहित्यरूपास `दलित आत्मचरित्र` असे न म्हणता `दलित आत्मकथन` या नावानेच संबोधने क्रमप्राप्त ठरते. या संदर्भात डॉ.आरती कुलकर्णी म्हणतात, "दलित स्वकथने ही आत्मचरित्र या साहित्यरूपबंधाची प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेली नाहीत तर आठवणी व आत्मचरित्र या साहित्यरूपांचे नवे उत्क्रांत रूप म्हणूनच ह्या `स्वकथना` कडे पाहिले पाहिजे."[२] तेव्हा या साहित्यरूपाचा दलित आत्मकथन म्हणून विचार करणे वाड:मयीन प्रगतीच्या दृष्टीने हितकारक ठरणारे आहे.

(२) `आत्मचरित्र` व `आत्मकथन` यातील साम्यभेद --

कोणत्याही साहित्यप्रकार लेखनामागे कोणते ना कोणते तरी प्रयोजन असते. आत्मपर लेखनात आजपर्यन्त जी आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत त्यांच्या मागे आत्मसुख, वाचकांना भारावणे, स्वत:चे आत्मस्तोत्र गाणे इ. हेतू असत.

त्यामध्ये आत्मशोध हा महत्वाचा असतो. डॉ. बोरगांवकरांच्या मते " स्वत:च्या जीवनाची स्वत: लिहिलेली कहाणी " म्हणजे आत्मचरित्र [3] लेखकाचे अनुभव व ते घेणारे व्यक्तित्व आत्मचरित्रात साकार व्हावे अशी अपेक्षा असते या अर्थाने, "व्यक्तीचा आयुष्यक्रम सांगणारा ग्रंथ " [4] किंवा " स्वत:च लिहिलेले स्वचरित्र " [5] असा यात कबुली जबाब असल्याने त्यात आत्मसमर्थन आणि नायकाच्या विचारांची व भावनांची आंदोलने आढळतात. तर दलित आत्मकथनामध्ये केवळ स्वत:च्याच जीवनाची कहाणी नसते तर स्वत: बरोबरच समाज जीवनाची दु:खे लेखकाला प्राधान्याने वर्णन करावयाची असतात. यामध्ये दलित जीवनाचे भोग, त्याची दाहकता व मनाला अस्वस्थ करणा-या यातना बरोबर ज्या सामाजिक परिस्थितीमुळे आपल्या वाट्याला हे जीवन आले ती सामाजिक व्यवस्था बदलली पाहिजे या भूमिकेतून हे लेखन केले जात असल्याचे दिसते. त्यात पिडित व पीडिक अशा दोन्ही समाजाच्या अंगांचे चित्रण येत असल्यामुळेच ज्योती लांजेवार म्हणतात " दलितांची आत्मचरित्रे म्हणजे समाजाने, संस्कृतीने, विषमतेने त्यांच्यावर चालविलेल्या अन्यायाचा व दुर्लक्षनांचा आलेख होय " [6] त्यामुळे समाज घटकाच्या मन:स्थितीचे देखील दर्शन घडते व संपूर्ण समाज त्यात साकारतो.

आत्मचरित्रामध्ये जुन्या आठवणींना उजाळा देणे व आपल्या आयुष्यातील सुखदु:खे दुस-यांना सांगितल्याने ती हलकी होतात ही त्या पाठीमागे भूमिका असते. पण दलितांच्या आत्मकथनामधून आलेली जीवनचित्रे ही त्यांच्या आयुष्यातील खडण्याचे, खरखरीतपणाचे, व त्यातून निर्माण झालेल्या वेदनांचे दर्शन घडवितात. म्हणून वामन निंबाळकर म्हणतात, " दलित आत्मकथा म्हणजे दलितांच्या वेदनांचे आलेख आहेत " [7] त्यातून त्यांच्या वेदनांचेच दर्शन जास्त घडते.

आत्मचरित्रे आयुष्याच्या मावळतीला लिहिली गेली आहेत. त्यामध्ये लेखकाच्या जीवनगाथे बरोबरच त्याचा भूतकाळ प्रतिबिंबीत झालेला पाहावयास मिळतो. तर दलित लेखक भूतकाळाविषयी सांगत असतानाच वर्तमानाशी संवाद साधत असतो व भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतो. कारण त्याचा वर्तमान घडत असतो आणि पुढील आयुष्याचा प्रवास त्याच्या समोर असतो. तेव्हा

आत्मचरित्रकार सौम्य दृष्टीने स्थिर जीवनाचे चित्रण करतो तर आत्मकथनकाराचे नाते गतिमानतेशी असते. आत्मचरित्रकाराप्रमाणे भूतकाळातील घटनांची केवळ नोंद न करता त्या घटनांचे तो कथनही करीत असतो. तेव्हा काळाचा संदर्भ म्हणूनही त्याचे फार महत्व आहे कारण काळाचा त्याच्या व्यक्तिमत्वावर परिणाम झालेला असतो.

आत्मचरित्रकार कांही अपवाद वगळता मध्यमवर्गीय व पांढरपेशीय जीवनाचे प्रतिनिधी आहेत. तर आत्मकथनकार सवर्णांनी नाकारलेल्या, अंधश्रद्धा, दारिद्र्य आणि अस्पृश्यता यांना बळी पडलेल्या समाजाचा प्रतिनिधी आहे. ते वेगवेगळ्या अस्पृश्य जाती-जमातीतून आलेले असल्याने त्यांच्या दु:खाची पातळी जातीनिहाय वेगवेगळी दिसून येते. उदा. मांग, महार, चांभार, ढोर, कैकाडी, उचल्या, पिंगळा जोशी, अक्करमाशी इ. जाती वैचित्र्यानुसार त्यांची दु:खेही त्यांच्या आत्मकथनातून वेगवेगळ्या रुपात वाचकाच्या समोर येतात. म्हणूनच या आत्मकथनामुळे उपेक्षितांचे अंतरंग उघड झालेले आहे.

आत्मचरित्र हे एका व्यक्तीमनाचे असते. लेखकाच्या त्यात प्रकट होणाऱ्या भावना संकुचीत स्वरुपाच्या असतात. तर आत्मकथन हे एकट्या व्यक्तिमनाचे नसून तो ज्या समूहाचा घटक आहे त्या समूहाचेही ते चित्रण असते. जणू कांही त्यातून समाजच बोलत आहे असे आपल्या लक्षात येते. आपल्या जाती संबंधी बोलणे म्हणजे आपल्या संबंधीच बोलणे आणि आपल्या संबंधी सांगणे म्हणजे समाजासंबंधी सांगणे असे तो मानतो. म्हणूनच आत्मकथन म्हणजे व्यक्तिमना बरोबरच समूह मनांचा जीवंत अनुभवाविष्कार होय असे म्हटले पाहिजे इतका त्याच्या जीवनात हा समाज पुरेपुर मुरलेला असतो. यामध्ये दलित समाज हाच खऱ्या अर्थाने नायकपदी असतो. आत्मकथनकार दलित जीवनातील अपार दैन्य आणि दु:ख यांचे भेदक चित्र वाचकापुढे उभे करतो. किंबहुना आपल्या समाजाच्या दु:खास इतर समाज कसा कारणीभूत आहे एवढेच सांगून थांबत नाही तर छळाला व दु:खाला स्वसमाजही कसा कारणीभूत ठरतो याचेही स्वच्छ चित्रण तो करत असतो. म्हणजेच त्याचे ते एकप्रकारचे आत्मपरीक्षणच असते. सत्य दर्शनाचे ते एक भेदक चित्र असते. आपल्या

समाजातील व्यंगे अधिक धीटपणे व कोणताही मुलाहिजा न ठेवता तो मांडत असतो. इतका परखडपणा आत्मचरित्रामध्ये क्वचितच पाहावयास मिळतो त्यामुळे आत्मकथनात येणारे आत्मपरीक्षण म्हणजे सामाजिक वास्तवाचा स्वच्छ आरसाच म्हणावा लागतो.

त्याचबरोबर वयाचाही घटक विचारात घ्यावा लागतो. आत्मचरित्रे आयुष्याच्या मावळतीला लिहीली गेली. त्यामुळे आयुष्याचा उतारकाळ हा संयमी असू शकेल. पण आत्मकथने ही एखादा अपवाद वगळता लेखकाने आपल्या कौमार्य काळात लिहीली असल्यामुळे त्यातून बंडखोर मन उसळी मारत असते. आपल्या प्रतिक्रिया तिव्रतेने व्यक्त करून वेगवेगळ्या परंपरागत समजुतींना जबरदस्त आव्हान देण्याची ताकद त्यात असते. दलित साहित्याची निर्मितीच मुळी दलित चळवळीतून झालेली असल्याने सामाजिक संघर्षात दलित लेखक साहित्याकडे एक हत्यार म्हणूनच पाहात असतो. ही समाज व्यवस्था बदलली पाहिजे, आपल्या व आपल्या समाजाच्या वाट्याला आलेले आर्थिक दारिद्र्य व सामाजिक कुचंबणा संपली पाहिजे या भूमिकेतून हे लेखन केले जात असल्याचे दिसते. त्यामुळे संयमापेक्षा ते आक्रमक बनलेले पाहावयास मिळते. एकंदरीत त्यातून विद्रोहाची भावना प्रकट होत असते. म्हणूनच बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, " आघातांनी शहाण्या झालेल्या, विस्तार पावत राहाणाऱ्या प्रश्नांनी प्रगल्भ केलेल्या, असंस्कृतपणाचा पदोपदी अनुभव घेत सुसंस्कृत झालेल्या संवेदनशील मनाची अथपासून इतिपर्यन्तची कुचंबणा म्हणजे या आत्मकथा होत".[6]

मराठीतील आत्मचरित्रे म्हणजे महाराष्ट्राचा चालता बोलता इतिहास असून ते मराठी संस्कृतीचे दर्शन असल्याबाबतचा निर्वाळा दिला जातो. त्यामुळे त्यात समाज, संस्कृती, शिक्षण यांचे संदर्भ पाहावयास मिळतात. तेव्हा आत्मकथनामध्ये गतकालीन इतिहास पाहावयास मिळत असला तरी आत्मकथनकार इतिहासकाराची भूमिका घेत नाही. आपला इतिहास हा आपल्यास व आपल्या पूर्वजांना तुडवून आपले सर्वस्व हिरावून घेणारा, अन्याय व गुलामगिरी लादणारा, घृणास्पद असल्याचा त्यास जाणीव आहे. हे सर्व त्याच्या मनात स्मृतीरूपाने

आहे तो ती स्मृती पुसू शकत नाही. म्हणूनच तो इतिहास, संस्कृती व परंपरा नाकारतो. तेव्हा हे सांस्कृतिक दु:ख मानवी जीवनाचा अनावर उद्‌गार असल्याने ते आत्मकथनाचे आशयद्रव्य ठरले आहे. म्हणून दलित आत्मकथने भारतीय समाज व्यवस्थेबद्दल बरेच कांही सांगूनसुध्दा या व्यवस्थेच्या पलीकडे जाणारी ठरतात. आत्मचरित्रकाराच्या लेखनामध्ये त्याच्या आयुष्याचा बहुतांश भाग आलेला असतो. प्रामुख्याने त्याच्या जन्मापासून याची सुरुवात झालेली असते. तर आत्मकथनामध्ये लेखकाच्या जीवनप्रवासाचे चित्रण त्या मानाने कमी आलेले असते. हे त्याच्या जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावरुन सुरु होते व बरेचदा त्यामध्ये आयुष्याचा थोडा कालखंड आलेला असतो. मात्र यामध्ये समाज जीवनाला प्राधान्य असते. कारण येथे `स्व' पेक्षा `स्व-समाज' व `स्वेतर समाज' यास मुख्य स्थान असते. तर आत्मचरित्रामध्ये त्या व्यक्तीच्या अनुषंगाने येणारा समाज मर्यादित स्वरुपाने आलेला असतो. त्याच बरोबर आत्मचरित्र हे सहसा एकदाच लिहीले जाते तर आत्मकथने मात्र त्याच्या वेगवेगळ्या जीवन जाणिवामुळे अनेकदा लिहीली जातात. उदा.मुक्ता सर्वगोडे यांच्या `मिटलेली कवाडे' या आत्मकथा नंतर त्यांचेच दुसरे आत्मकथन `करपलेले धुमारे' हे प्रसिध्दीच्या मार्गावर आहे. लक्ष्मण माने यांच्या `उपरा' या आत्मकथना नंतर `बंद दरवाजा' यामधून त्यांनी कांही अनुभव मांडलेले आहेत. यावरुन त्यांच्या जीवनातील अनेक दाहक अनुभवांचा विस्तार यातून जास्तीत जास्त पाहण्यासाठी मिळतो.

आत्मचरित्रकार हा सामान्यत: आपल्या सफल व समृध्द जीवनाच्या आठवणी त्यात चित्रित करतो हे लेखक कांही अपवाद वगळता समाजातील नामवंत मंडळी असतात. पण आत्मकथनकार हा कोणी महान व्यक्ती नसून एका गाव - कुसाबाहेर वाढलेल्या अस्पृश्य समाजातून आलेला असतो. त्यांना कोणत्याही क्षेत्रात आत्मकथन लिहीण्याआधी मानाचे स्थान मिळालेले नसते. उलट त्याच्या जीवनात मनाला अस्वस्थ करणाऱ्या घटनाच जास्त घडत असतात. त्यामुळे आपल्या वाट्याला आलेले हे जीवन असे का ? अशा प्रश्नाचा तो वेध घेत असतो. एक प्रकारे त्यामध्ये साऱ्या समाजाचाच वेध घेतलेला असतो. म्हणून प्रा.डॉ.आरती कुलकर्णी म्हणतात ,

ते स्वत:च्या अस्मितेच्या शोधातून स्वकथने लिहीली गेली असली तरी स्वत:च्या संदर्भात विचार करत असतानाच त्याचा संपूर्ण समाजच त्याच्या लेखणीतून साकार होताना दिसतो." त्यामुळे या आत्मकथना मध्ये चिंतनशील भाष्यही केलेले असते. आणि स्वत:च्या दु:खाबरोबरच आपल्या समाजाच्या दु:खी जीवनाची लक्तरे वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करतो. यामुळे आत्मकथनामध्ये आत्मनिष्ठेबरोबरच वस्तुनिष्ठतेचेही दर्शन घडते.

एकंदरीत आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे दलित समाजाचे आत्ममान जागृत झाले. व प्रस्थापित चातुर्वर्ण्य व्यवस्थेसमोर त्यांचेच अन्याय निर्भिडपणे मांडण्याची हिंमत त्यांच्यामध्ये आली. आजपर्यन्त मूक राहिलेल्या व अनेक दु:खे पोटात साठवून जीवन जगणाऱ्या या समाजास वाचा फुटली आणि हा समाज बोलू लागला. आपल्या व्यथा व जीवन गाथा या आत्मकथनातून मांडू लागला. म्हणून डॉ. आरती कुलकर्णी म्हणतात, " जे जे भोगावं लागलं, जगताना जे जे अनुभव आलेत ते प्रामाणिकपणे व प्रांजळपणे मांडणे या भूमिकेतून ही दलित स्वकथने लिहीली गेली आहेत." १०

दलित आत्मकथनाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे स्वत:च्या गतकाळातील घडलेल्या महत्वाच्या बारीक सारीक घटनांही तो लेखक कथन करीत असतो. आणि या घटना व प्रसंग ज्या प्रदेशात घडतात त्या प्रदेशाचेही न कळत दर्शन घडते. तेव्हा सर्व दलित आत्मकथनामध्ये येणारे स्त्री-पुरुष प्रादेशिक वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. त्यामुळे अनेक प्रदेशाबरोबरच त्यांच्या भाषा, रीतिरिवाज जीवन जगण्याची पध्दत इत्यादी गोष्टींचे वेगळेपणाही त्यात प्रकट होते. केशव मेश्राम 'हकिकत व जटायू' मध्ये वऱ्हाडी भाषेतून तेथील जीवनाची ओळख करून देतात. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' व शंकरराव खरात यांच्या 'तराळ - अंतराळ' मध्ये सांगली साताऱ्याचा प्रदेश येतो. मराठवाड्याचे जीवनदर्शन प्र.ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणीचे पक्षी' मधून घडते. कोकणी बोलीतून कोंडविलकरांच्या 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे' मध्ये कोकणचा परिसर येतो. नानासाहेब झोडगे यांच्या 'फांजर' मध्ये माणदेशी माणसांचे चित्रण येते, तर उत्तम बंडू तुपे यांच्या

'काट्यावरची पोटं' पुणेरी भाषेचे फटके पाहावयास मिळतात. रुस्तुम अचलखांब यांची 'गावकी' औरंगाबादी आहे तर शरणकुमार लिंबाळे यांची 'अक्करमाशी' सोलापूरी भाषेचे प्रतिनिधित्व करणारी आहे. 'उपरा' व 'गबाळ' मध्ये यांची तर 'काट्यावरची पोटं' मध्ये मांगाची, मिटलेली कवाडे, बलुतं, फंजर 'माज्या जल्माची चित्तर कथा' मध्ये महाराची आणि 'मुक्काम - पोष्ट देवाचे गोठणे' मध्ये 'चांभाराची भाषा वाचकाच्या समोर येते. आत्मकथनामध्ये येणारा बहुतांश समाज हा खेड्यात राहणारा असल्याने त्याच्या दैनंदिन जीवनातील बोलीचा वापर आत्मकथाकारांनी केल्यामुळे त्यातील घटना, प्रसंग, संवाद नेमके, जिवंत व रसरशीत उतरलेले आहेत. दलित समाजाच्या भाषेत रांगडेपणा आहे, शिवराळपणा आहे. उच्चभ्रू लोकांना हीन आवडणारी भाषा आहे असा समज दिसून येतो. परंतु ही आत्मकथने वाचताना त्या बोली - भाषेतील गोडवा आणि क्रांतीकारकता डोळे दिपवून टाकणारी आहेत याचा प्रत्यय येतो.

अशा प्रकारे आत्मचरित्र व आत्मकथन यांच्या वैशिष्टयांचा विचार करुन ही आत्मकथने कोणकोणत्या घटकामुळे आत्मचरित्रापेक्षा वेगळी आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न करुन त्यातूनच दलित आत्मकथनाच्या स्वरुपावर प्रकाश टाकला आहे.

दलित आत्मकथनांचा विकास ---

मराठी साहित्यामध्ये दलित साहित्याची भर गेल्या कांही वर्षापासून पडत आहे. आपल्या कथा, काव्य, आत्मकथने, नाटके इ. साहित्य रुपातून वेगवेगळ्या अनुभवांचे चित्रण केल्याने वाचकास एका वेगळ्याच जगाचे दर्शन घडत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय लोकशाहीने प्रदान केलेल्या हक्कामुळे तळागाळातील लोकांची अस्मिता जागी झाली. आपल्या शोषणयुक्त जगण्याची जाणीव त्यांना प्रथमच झाल्याने हे शोषित मन जागे झाले. शिक्षणाने जाग आलेल्या या दलित मनांनी हजारो वर्षे कोंडून ठेवलेल्या दु:खांना वेगवेगळ्या साहित्य रुपातून वाट करुन देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना 'आत्मकथन' हा साहित्य

प्रकार जवळचा वाटला. कारण एकूण दलित साहित्याची प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जीवनप्रणाली व त्यांचे तत्वज्ञान आहे. त्यांनीही आपले जीवनानुभव अनेक भाषणातून व सभा सम्मेलनातून व्यक्त केले आहेत. याचाच प्रभाव या दलितांच्या रचनेवर असलेला पाहावयास मिळतो. डॉ. आंबेडकरांच्यापूर्वी अस्पृश्य संत मंडळींनी आपल्या रचनेतून आपल्या व्यथा, दु:खे मांडली आहेत. परंतु ही दु:खे मूलत: अध्यात्मिक स्वरुपाची होती. संतांच्या या रचनेमध्ये सामाजिक दु:ख व पीडा असली तरी त्यात सामाजिक बंडखोरी पाहावयास मिळत नाही. फक्त पारमार्थिक प्राप्तीसाठी धडपडणाऱ्या मनाचे आक्रंदन मात्र त्यात पाहावयास मिळते. परंतु ज्या सामाजिक व्यवस्थेने आपल्यास गुलाम बनविले, पशूपेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली, आपल्या जीवनात अंधार निर्माण केला आणि जीवनाच्या सर्व वाटा बंद केल्या त्या संबंधात विरोधी सूर मात्र त्यांनी कोठेही व्यक्त केलेला नाही. त्यांच्या रचनेत कांही ठिकाणी बंडखोरी पाहावयास मिळत असली तरी ती परमेश्वराशी भांडण्यात व्यक्त झालेली आहे. परंतु या जातीयतेच्या बंधनातून मुक्त होऊन बाहेर पडणारे मन मात्र त्या अस्पृश्य संतांच्या रचनेत पाहावयास मिळत नसल्याने आजच्या विद्रोही आत्मकथनाशी त्याचा सांधा जुळवता येत नाही. म्हणूनच दलित साहित्याची खरी प्रेरणा डॉ.आंबेडकरच ठरतात.

अनेक कारणांनी आजवर गुदमरलेली मने यामुळे आत्मकथनातून भरारी मारु लागली. म्हणूनच 'हजारो वर्षे दबलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी दलित लेखकांना आत्मपर लेखनाचा हा आकृतिबंध जास्त जवळचा वाटलेला आहे हे या वाङ्मयप्रकाराचे बळ म्हणावे लागेल.' ११

स्वत:च्या जीवना बरोबरच अस्पृश्य समाजातील दैन्य, दु:ख, लाचारी व दलितत्वामुळे भोगाव्या लागणाऱ्या यातना यांचे आत्मकथनातून प्रथम चित्रण दया पवार यांनी 'बलुतं' मधून इ.स.१९७८ मध्ये केले. यामध्ये सवर्णांनी केलेल्या अत्याचारामधून निर्माण झालेल्या दु:खा बरोबरच स्वजातीतील लोकही अनेकवेळा या दु:खास कसे कारणीभूत ठरतात याचे वास्तव दर्शन त्यांनी घडविले आहे. स्वत:च्या कुटुंब कहाणी बरोबरच त्यांच्याशी संबंधित येणाऱ्या पात्रांच्याही

दु:खाचे दर्शन यात घडविले आहे. तेव्हा गो.म.कुलकर्णी म्हणतात, " आत्म - चरित्राचा आरंभ बिंदू म्हणून दया पवारांचे ' बलुत ' विशेष महत्वाचे आहे. "[१२]

इ.स.१९७९ मध्ये प्र.ई.सोनकांबळे ' आठवणींचे पक्षी ' मधून आपल्या गतजीवनाकडे पाहातात. जे घडले ते जसेच्या तसे शब्दातून मांडणे ही त्यांची भूमिका असते. सर्व दलिताप्रमाणे सोनकांबळे यांच्या वाट्याला आलेल्या दु:खाचाच अविष्कार यात आला असून त्या दु:खाचे वेगवेगळे पदर पाहावयास मिळतात. अस्पृश्य आणि दारिद्र्य यामुळे निर्माण झालेल्या यातना सोनकांबळे यांनी प्रांजळपणे मांडलेल्या आहेत. एकंदरीत ' पोटात साठविलेल्या अनुभवांचा निचरा व्हावा, हाच ' आठवणींचे पक्षी ' लिहिण्यामागचा हेतू "[१३] या अंत:मुक्तेतून आपल्या जीवनातील अनेक भयानक व खडतर अनुभवाचे नागडे उघडे चित्रण करुन भटक्या समाजाचे दु:ख दाखवून दिले आहे. तर लक्ष्मण माने यांचा ' उपरा ' मधील एक आगळा वेगळा प्रवास १९८१ मध्ये वाचकासमोर आला. गाढवाच्या पाठीवर संसार लादून भटकंती करणाऱ्या भटक्या कैकाडी जमातीला एका वाड:मयाच्या रुपाने वाचकांसमोर आणाण्याचा हा पहिला प्रयत्न आहे. " अस्पृश्यापेक्षाही अधिक खडतर जीवन जगणाऱ्या कैकाडी जमातीच्या दु:खाचा हुंदकाच ' उपरा ' मधून स्पष्टपणे ऐकू येतो. "[१४] अशी जाणीव होते. तेव्हा आपला कैकाडी समाज, त्याच्या चालीरीती, अंधश्रध्दा, स्त्री-जीवन, जातपंचायत इत्यादिचे वास्तव चित्रण ' उपरा ' काराने साकार केले आहे.

१९८१ मध्ये शंकरराव खरात यानी ' तराळ - अंतराळ ' मधून अस्पृश्यांच्या दु:खाची, अपमानाची गाथा लिहिलेली पाहावयास मिळते. यामध्ये खरातानी आपल्या जीवनानुभवांचे तीन कालखंड साकार केले असल्याने त्यांच्या जीवनाचे सलग कथन येते. आज अस्पृश्यवर्गाच्या भेदक दु:खाचे चित्रण केल्यामुळे प्रा.डॉ.सौ.आरती कुलकर्णी म्हणतात, " या आत्मचरित्राला लाभलेल्या अनेक आयामामुळे ' दलित आत्मचरित्रांचा दीपस्तंभ ' म्हणून याचा उल्लेख करता येईल. "[१५] ' मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे ' मध्ये माधव कोंडविलकर यांनी कोकणातील चांभार जीवनाचे चित्रण केले आहे. त्यातल्या पानापानातून तडफडणारे, तगमगणारे आणि तरीही

स्वत:चा सोशिकपणा व समजूतदारपणा गमावून न बसलेले एक सुसंस्कृत मन यात प्रकट झाले आहे. दलित लेखकांच्या आत्मकथनामध्ये बहुतांश आत्मकथने ही पूर्वाश्रमी भोगलेल्या यातनामुळे लिहीली आहेत. या महार समाजा बरोबरच मांग, चांभार, ढोर इ. तथाकथित अस्पृश्य, मानलेल्या जमाती पैकी कांही जाती मधील लेखकांनी अस्पृश्यतेने वाट्याला आलेल्या पाशवी पातळीवरच्या दु:खी जीवनाचे चित्रण केले आहे. उत्तम बंडू तुपे या मातंग समाजातील लेखकाने आपल्या `काट्यावरची पोटं` मधून अत्यंत तटस्थपणे अस्पृश्यता व दारिद्र्य याविरुध्द सतत संघर्ष करणाऱ्या मातंग जमातीच्या लोकांचा हा आलेख अत्यंत प्रांजळपणाने शब्दांकीत केला आहे व मातंग समाजाच्या दु:खाना वाचा फोडण्यासाठी मदत केली आहे.

`फंजर` हे एका कार्यकर्त्या असणाऱ्या ना.म. झोडगे या व्यक्तीने लिहीलेले आत्मकथन आहे. `फंजर` म्हणजे बामळ, बोरीचे वाळलेले झुडूप. या काटेरी झुडूपाप्रमाणेच लेखकाचाही येथे जीवन प्रवास पाहावयास मिळतो। कार्यकर्ता म्हणून लेखकाचे जीवन कसे घडत गेले हे दाखवत असताना जातीय विचामतेतून मनास बसलेले चटकेही त्यांनी चित्रीत केले आहेत. शरणकुमार लिंबाळे आपल्या `अक्कर - माशी` तून स्वजीवनाच्या वेगळ्याच व्यथा मांडतात. त्याच बरोबर स्त्री जीवनाचा एक वेगळाच पैलू लिंबाळे यांनी दाखवून दिला आहे. अशा प्रकारे भारतीय लोकशाहीने प्रदान केलेल्या हक्कामुळे या अस्पृश्य वर्गातील तरुणांना शिक्षणाची कवाडं उघडी झाली. शिक्षणाने सुसंस्कृत झाल्यामुळे स्वत:च्या जीवना बरोबरच स्वसमाजाच्या जीवनाचे निरीक्षण करुन त्यांची दु:खे वेशीवर मांडण्याचा प्रयत्न या दलित आत्मकथनातून लेखकांनी केला आहे. `गबाळ` दादासाहेब मोरे, `गावकी`, रुस्तुम अचलखांब, `कुस्ती` विजय शिरसाट, `आभरान` पार्थ पोळके, `धुळपाटी` श्रीरंग तळवारे, `कोंडाळ` तुषार भास्वंत, `झाळा` ल.स. रोकडे, `माऱ्हुडा` पां.ऊ.जाधव, `उचल्या` लक्ष्मण गायकवाड `तांडा` आत्माराम राठोड, `जातीला जात वैरी` ना.म.शिंदे, या सर्व आत्मकथनामधून अनेक जाती जमातीच्या लेखकांनी या जमातीच्या दु:खांचे व

यातनांचे दर्शन घडविले. आणि या चातुर्वर्ण्य व्यवस्थेखाली दडपलेला मोठा मानवसमूह भारतात अस्तित्वात असल्याची जाणीव या दलित आत्मकथनकारानी इतर मराठी साहित्यिकांना करून दिली आहे. दलित आत्मकथनांची आता लाटच उसळली आहे. यापेक्षाही याची यादी वाढवता येण्यासारखी आहे. बाबासाहेबांच्या प्रेरणेमुळे जनजागृती आलेल्या या आत्मकथनकारांनी आपली दु:खे मांडून एकूण रसातळाच्या वर्गाचे जीवन वाचकासमोर ठेवले आहे.

## दलित स्त्रियांची आत्मकथने ---

वरील आत्मकथनाबरोबरच अलिकडे स्त्री आत्मकथनानी देखील या दलित आत्मकथनामध्ये भर घातल्यामुळे या आत्मकथनाना एक नवाच आशय प्राप्त झाला आहे. दलित स्त्रियांनी लिहीलेली ही आत्मकथनेसुध्दा केवळ मनोरंजनासाठी किंवा आठवणींचा चाळा करण्यासाठी लिहीली नाहीत. त्यानीही एक दलित स्त्री म्हणून जीवन जगत असताना आपल्या वाट्याला आलेले दु:ख व त्यातील दाहकता प्रकट करण्यासाठीच या आत्मकथनाना जन्म दिला आहे. यामधून स्वत:च्या जीवनाबरोबरच याच समाजात राहणाऱ्या दलित स्त्रीच्या माथी येणाऱ्या विविध दु:खांचे दर्शन अत्यंत सोशिकपणे घडविले आहे. ' माझ्या जल्माची चित्तर कथा ' लिहीणाऱ्या सौ. शांताबाई कृष्णाजी कांबळे सारखी जुन्या जमाण्यातील स्त्री यात प्रथम समाविष्ट झाली आहे. शांताबाईंनी स्वत:च्या जीवनाची चित्तरकथा सांगत असतानाच अनेक यातना सहन करत आपण ईप्सित स्थळी कसे पोहोचलो याचा संपूर्ण आढावा यात घेतला आहे. तर सामाजिक विषमतेमुळे व स्वजातीतील स्वार्थी पुढाऱ्यामुळे या अस्पृश्य वर्गाच्या जीवनाची मिटलेली कवाडे उघडण्याचा प्रयत्न मुक्ता सर्वगोड यांनी ' मिटलेली कवाडे मधून केलेला आहे. सामाजिक दायित्व पत्करून व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायित्व पत्करून या अस्पृश्य समाजाची सेवा करत असतांना त्याना आलेले विविध अनुभव त्यांनी येथे वस्तुनिष्टपणे मांडलेले आहेत. तसेच ' मला उध्वस्त व्हायचंय ' मधून उध्वस्त होऊ पाहणाऱ्या मनाचं मलीका अमर शेख ने केलेले रेखांकन तितकेच महत्वाचे आहे. ' जिणं आमुचं '

मधून बेबी कांबळे यांनी पन्नास वर्षापूर्वीच्या पश्चिम महाराष्ट्रातील महार समाजाचे व प्रामुख्याने स्त्री-जीवनाचे दाहक चित्रण येथे केले आहे. त्यामुळे स्त्री जीवन चित्रण हा या आत्मकथनाचा गाभा ठरला आहे. तर प्रा. सौ.कुमुद पावडे यांनी ' अंत:स्फोट ' मधून स्वजीपनापेक्षा समाजातील विषमता,आपल्याच जात बांधवाकडून मिळालेले वागणूक इत्यादी बाबी वाचकांचे लक्ष वेधून घेण्याइतपत मांडलेल्या आहेत.

या " दलित लेखिकांची एक स्त्री म्हणून इतर स्त्रियाप्रमाणे दु:खे आहेतच, पण त्यापेक्षाही दलित स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले जन्मदु:ख शब्दातीत आहे. कोणत्याही दैववादाने किंवा नियतीमुळे तिचे सामाजिक दु:ख जन्मले नाही तर अनितीशरण आणि वर्णस्वैर उद्दाम संस्कृतीने तिला अप्रतिष्ठीत राखले याचा शिलालेख म्हणजे दलित स्त्रियांची आत्मकथने होय " [१६] त्यामुळे या दलित स्त्रियांची आत्मकथने वाचकांना एका वेगळ्याच अनुभवविश्वात नेतात हे याचे मोठेपण आहे.

आंबेडकरी विचारांनी भारुन गेलेल्या अस्पृश्य वर्गातील स्त्री-पुरुषा लेखकांनी आपापल्या स्वजीवनातील व स्वजातीतील दु:खे मांडून जणू मनाचा निचरा केलेला आहे. आजपर्यन्त लिहील्या गेलेल्या या आत्मकथनांचा विचार केला असता " ज्याला आजपर्यन्त बोलू दिलं नव्हतं त्यांचा कंठ मोकळा झाल्यामुळे ते बोलणं तीव्र होतं आहे, अंतरीचं स्वाभाविकपणेच बाहेर येत आहे. " [१७] हे प्रा.अरुण कांबळे यांचे मत योग्य वाटते.

या सर्व दलित आत्मकथनातून लेखकांनी आपली व आपल्या समाजाची दु:खे वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला आहे, की जी या समाज व्यवस्थेने निर्माण केली होती. या अन्यायी समाज रचनेला बदलून नवी समतेची समाज रचना अस्तित्वात यावी हेच त्याचे या मागील स्वप्न आहे. या आत्मकथनामधून वस्तुनिष्ठ जीवन वास्तव आणि व्यक्तिगत भावभावना यांचा मोकळा अविष्कार करण्याचे हे महत्वाचे साधन या आत्मकथनकारांना लाभल्यामुळे या आत्मकथनांना मराठी साहित्यात एक वेगळेच स्थान प्राप्त झाले आहे.

वरील पैकी आपल्यास `माज्या जल्माची चित्तरकथा` सौ. शांताबाई कृष्णाजी कांबळे व `मिटलेली क्वाडे` मुक्ता सर्वगोड` यांच्या आत्मकथनांचा विचार प्रस्तुत शोध प्रबंधीकेमध्ये करावयाचा आहे. शांताबाईंचे हे आत्मकथन दलित स्त्री आत्मकथनांमधील पहिलेच असल्याने त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. एक दलित स्त्री म्हणून जीवन जगत असताना, शिक्षिकेची नोकरी करत असताना त्यांना आलेले अनुभव व त्यातील दु:खे त्यांनी प्रांजळपणाने मांडलेली आहेत. शिक्षणाच्या माध्यमाने अस्पृश्य समाजाचा विकास करणारी ही स्त्री अनेक यातना अवहेलना सहन करत आपल्या ईप्सित स्थळी कशी पोहोचली याचे दर्शन त्यांच्या आत्मकथनातून घडते.

तर हजारो वर्षे हिंदू संस्कृतीने या अस्पृश्य समाजाच्या सर्व न्याय हक्काची पायमल्ली केली. कधी जातीचा आधार घेऊन तर कधी श्रेष्ठ कनिष्ठतेचा आधार घेऊन , यांना सवर्णांनी दु:खच देण्याचा प्रयत्न केला. यांना मानवी जीवनापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. या बरोबरच आपल्याच समाजातील सत्तेच्या व स्वार्थाच्या अभिलाषेने झपाटलेल्या पुढा-यांनीही आपल्या समाजास दारिद्र्याच्या व अडाणीपणाच्या चिखलात रुतवून एकंदर या अस्पृश्य समाजाच्या विकासाची कवाडे कशी बंद केली याचा वेध मुक्ताबाईंनी घेतला आहे आणि ही मिटलेली कवाडे उघडण्याचा प्रयत्न समाज कार्यातून मुक्ताबाईंनी केला हे त्यांचे कार्य स्तुत्य मानावे लागते. शिक्षणाच्या आधारे अस्पृश्य समाजाचा विकास करु पाहाणा-या सौ.शांताबाई कांबळे तर अनेक यातना सहन करुन,अपमान व अवहेलना यांना न जुमानता याच अस्पृश्य वर्गाच्या समृध्दीची कवाडे उघडण्याचा प्रयत्न करणा-या मुक्ता सर्वगोड आहेत. केवळ या समाजाची सेवा घडावी आणि या वर्गास समाजात मानाने जगता यावे यासाठी त्यांची चालेली धडपड पाहावयास मिळते. या दोन्ही आत्मकथनातून तत्कालीन स्त्री जीवन व एकंदर अस्पृश्य समाजाचे जीवन कसे यातनामय होते यावर लेखिकांनी प्रकाश टाकला आहे. दलित स्त्री आत्मकथनाची सुरुवात म्हणून शांताबाईंच्या आत्मकथनाचे महत्व मोलाचे आहे तर याच आत्मकथनाच्या विकासाच्या टप्प्यातील मुक्ताबाईंचे आत्मकथनही त्यातील अनेक

गुणांनी वाचकाचे मन आकर्षून घेणारे आहे म्हणूनच प्रस्तुत शोध प्रबंधिकेसाठी वरील दोन्ही आत्मकथांची निवड केली आहे.

## संदर्भ सूची


१ प्रा.चंद्रकुमार नलगे - गंगाधर पानतावणे --
दलित आत्मकथन - सुरेश एजन्सी,
पुणे, प्रथमावृत्ती २६ जानेवारी, १९८६ प्रस्तावना

२ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे कुलकर्णी -
दलित स्वकथने : साहित्यरूप
विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर,
प्रथमावृत्ती - ३ जानेवारी, १९९१ पृ.२९.

३ डॉ.विमल मालेराव - आधुनिक मराठी वाङ्मयातील
स्त्रियांची आत्मचरित्रे - एक अभ्यास,
साहित्य प्रसार केन्द्र - सीताबर्डी, नागपूर
प्रकाशन दि. २५ मार्च, १९८६ पृ.१५.

४ प्र.न.जोशी - आदर्श मराठी शब्दकोश, प्रथमावृत्ती-१९७९ पृ.२९७.

५ संपा.द.ह.अग्निहोत्री - अभिनव मराठी-मराठी शब्दकोश
प्रथमावृत्ती - १९८३ पृ.२००.

६ संपा.मृणालिनी पाटील, ज्योती लांजेवार, मदन धनकर -
समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह
विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर,
प्रथमावृत्ती १ मे १९८५ पृ.२८६.

७ वामन निंबाळकर - दलित साहित्य स्वरूप व भूमिका
प्रबोधन प्रकाशन - नागपूर-१२
प्रथमावृत्ती - १ जून १९८६ पृ.१०७.

८ संपा.गो.मा.पवार,म.द.हातकणंगलेकर -
मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-४०००३४
पहिली आवृत्ती-१९८६ । १९९७ पृ.२९८.

९ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे - कुलकर्णी - उ.नि. पृ.३३.

१० तत्रैव पृ.३०.

११ मधु कुलकर्णी - ललित साहित्यातील आकृतिबंधाची जडणघडण
प्रकाशन
प्रथमावृत्ती - १९८७ पृ.१३१

१२ प्रा.गो.म.कुलकर्णी - दलित साहित्य प्रवाह आणि
प्रतिक्रिया - प्रतिमा प्रकाशन - पुणे,
प्रथमावृत्ती - १३-१-१९८६ प्रस्तावना

१३ निलीमा भावे - सत्यकथा जानेवारी १९८० पृ.२९

१४ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे - कुलकर्णी - उ.नि. पृ.६५

१५ तत्रैव पृ.११५

१६ संपा.प्रा.चंद्रकुमार नलगे , डॉ.गंगाधर पानतावणे
स्त्री आत्मकथन - सुरेश एजन्सी,
पुणे, प्रथमावृत्ती - जुलै १९९० प्रस्तावना

१७ प्रा.गो.म.कुलकर्णी -- उ. नि. पृ.७९.